स्वातंत्र्यसैनिक हरीकाका भडसावळे विचारधारा समर्पित

एस. आर. टी. शेतकरी सन्मान सोहळा २०२६

६ वे वर्ष

# पुरस्कारार्थी व SRT शेतीशाळा परिचय पुस्तिका

SAGUNA RURAL FOUNDATION

सगुणा बाग
शेतीतून प्रतिष्ठेकडे ...

सगुणा रुरल फाउंडेशन, नेरळ, रायगड

# एस.आर.टी. ची ही पुस्तिका कशी वापरावी?

१




ह्या बटणांवर क्लिक करून पुरस्कारार्थींची यादी, जिल्हावार तसेच पिका प्रमाणे शेतकऱ्यांची माहिती पाहा.

२

जिल्हावार प्रमाणे सूची




३




ह्या नावांवर क्लिक करून संबंधित शेतकऱ्याची सविस्तर माहिती पहा.



ह्या बटणांवर क्लिक करून मुख्य सूचीच्या पानांवर जा.

# अनुक्रमणिका

खालील बटणांवर क्लिक करून पुरस्कारार्थींची यादी,
जिल्हावार तसेच पिका प्रमाणे शेतकऱ्यांची माहिती पाहा.



SRT पुरस्कारार्थी
२०२६ →



SRT अधिकृत
शेतीशाळा केंद्र धारक →



जिल्हावार सूची →

CQUESTER TECHNOLOGIES

CQUESTER कंपनी
विषयी थोडक्यात →

सोशल मीडिया

# एस. आर. टी.
# पुरस्कारार्थी 2026

१. श्री. निलेश दत्तात्रय पानसरे

२. श्री. सुरेश अशोकराव नरवडे

३. श्री. दिपक पुरुषोत्तम जोशी

४. श्री. किशोर उत्तमचंद जैन

५. श्रीमती उषा सुधाकर देवरे

६. डॉ. एस. डी. सोमवंशी

७. सौ. मीरा राजेभाऊ काळे

८. श्री. वामन पदु कडाळी

९. श्री. विलास मनोहर झुंझारराव

१०. श्री. पंकज लोटन देसले

११. श्री. शंकर गोविंदा गायकवाड

१२. श्री. केशव आश्रुबा गिराम

शेतकऱ्यांची अजून नावे पुढील पानावर...

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

एस. आर. टी.

# पुरस्कारार्थी 2026

१३. सौ. कीर्ती केशव नगरे

१४. श्री. शिवाजी ज्ञानोबा बादाडे

१५. श्री. स्वप्नील दिपक महाजन

१६. श्री. गोपाळ शंकर झगडे

१७. श्री. रामचंद्र देहू हाबळे

१८. श्री. अरुण पंढरीनाथ तांडेल

१९. श्री. दत्तात्रय दगडू जंगाले

२०. श्री. राजाभाऊ वैकुंठराव देशमुख

२१. श्री. विद्याधर बबनराव शिंदे

२२. श्री. महारु तुळशीराम जाधव

२३. श्री. दिनकर संजयराव काळे

२४. श्री. प्रकाश गणपतराव खोब्रागडे

शेतकऱ्यांची अजून नावे पुढील पानावर...

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

२५. श्री. नागेंद्र रेड्डी

२६. श्री. भगवान रेड्डी

२७. श्री. गोविंद नेवजू धूम

२८. श्री. अभिनंदन अजित सौंदत्ते

२९. श्री. रामचंद्र प्रभाकर पुंड

३०. श्री. वेंकटराव मलेला

३१. श्री. परशुराम तातू आगिवले

३२. डॉ. गणेश श्रीरंग पोटे

३३. श्री. उमेश गोविंदराव पोहदरे

एस. आर. टी.
# शेतीशाळा केंद्र धारक

१. श्री. विठ्ठल मारोती वैद्य

२. श्री. रावसाहेब दगडू मोरे

३. श्री. रामचंद्र प्रभाकर पुंड

४. श्री. शिरीष कुलकर्णी

५. श्री. परशुराम तातू आगिवले

६. श्री राहुल दिलीप पाटील

७. श्री. किरण संपत यादव

८. श्री. विलास गजानन महल्ले

९. श्री. उमेश गोविंदराव पोहदरे

१०. श्री. कृष्णा वाघुजी गेडाम

शेतकऱ्यांची अजून नावे पुढील पानावर...

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

एस. आर. टी.

# शेतीशाळा केंद्र धारक

११. श्री. सदाशिव वामनराव अडकीने

१२. श्री संजय शंकरराव चिचघरे

१३. श्री. संदीप नामदेव भागवत

१४. श्री. राजकुमार रामभाऊ ठाकरे

१५. सौ. पुनम सचिन बडोने

१६. सौ. लता अनिलराव पोहेकर

१७. श्री. अभिनंदन अजित सौंदत्ते

# एस. आर. टी.
# पुरस्कारार्थी



पुरस्कारार्थींची माहिती पुढील पानावर...

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची



# १.

## श्री. निलेश दत्तात्रय पानसरे

मु. पेडगाव, ता. श्रीगोंदा,
जि. अहिल्यानगर,
मो. 96236 65710

निलेश पानसरे हे गेली १० वर्षे एसआरटी पद्धतीने शेती करत आहेत. एसआरटी पद्धतीने ऊस, भाजीपाला, कापूस, आणि कांदा ही पिके घेतात. कापसाचे उत्पादन १.५ एकरमध्ये ८क्विंटल आणि ऊसाचे उत्पादन 60 टन आहे. त्यांनी एकूण २० एकर क्षेत्रावर एसआरटी पद्धतीचा अवलंब केला आहे. एसआरटी पद्धतीने शेती केल्याने जमिनीची सुपीकता वाढल्याचा त्यांचा अनुभव आहे. त्यांना लागणाऱ्या पाण्याचा वापर कमी झाला आहे आणि जमीन मऊ आणि सच्छिद्र झाली आहे. उत्पादन आणि गुणवत्ता दोन्ही चांगले आहे. टोमॅटो आणि अन्य पिकांची वाढ चांगली झाली आहे आणि पिके भरघोस वाढली आहेत.

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची



# २.

## श्री. सुरेश अशोकराव नरवडे

मु. पाचोड ता. पैठण
जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. 92093 77477

हे गेली तीन वर्षे ७ एकर क्षेत्रावर SRT पद्धतीने शेती करत आहेत. त्यांनी कापूस व सोयाबीन ही पिके तसेच सोयाबीन आंतरपीक घेतले आहे. बदलत्या हवामानातही नियोजनबद्ध शेती करण्यावर त्यांचा भर असतो. साडेचार फूट गादीवाफ्यावर लागवड केल्याने पारंपरिक पद्धतीपेक्षा कापूस व सोयाबीनचे उत्पादन दोन ते चार क्विंटलने वाढल्याचा त्यांचा अनुभव आहे. योग्य अंतर व मोकळी माती यामुळे पिकांची वाढ जोमदार होते. त्यामुळे उत्पन्नातही समाधानकारक वाढ दिसते. SRT पद्धतीमुळे मजुरीची बचत होते आणि गादीवाफ्यांमुळे ओलावा टिकून राहतो. त्यामुळे पिकांना ताण कमी बसतो आणि वाढ निरोगी होते. या पद्धतीमुळे शेती अधिक सोपी व परवडणारी झाल्याचे ते सांगतात.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# ३.

## श्री. दिपक पुरुषोत्तम जोशी

मु. देवगाव, ता. पैठण,
जि. छ संभाजीनगर,
मो. 98505 09692

दीपक जोशी गेली ८ वर्ष एस.आर.टी. पद्धतीने शेती करत आहेत. खरिपात ते कापूस, तूर आणि रब्बी हंगामात हरभरा आणि मका पिके घेतात. त्यांनी १० एकर क्षेत्रावर एस.आर.टी. शेती केली आहे. एसआरटी पद्धतीने शेती केल्याने जमिनीत सेंद्रिय पदार्थ आणि सेंद्रिय कार्बन वाढला आहे. पाण्याचा संवर्धन होऊन मातीची धूप कमी झाली आहे. तसेच मातीची गुणवत्ता सुधारली आहे. कीड नियंत्रण खर्च कमी झाला आहे. पिक उत्पादन वाढले आहे (उत्पादन दुप्पट झाले आहे) रासायनिक खते व कीटनाशक वापर कमी झाला आहे. एसआरटी तंत्रज्ञान शेती कोरडवाहू क्षेत्रासाठी वरदान आहे.

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची



# ४.

## श्री. किशोर उत्तमचंद जैन

मु. शिरसाळा, ता. बोदवड,
जि. जळगाव,
मो. 85520 03875

आर्थिक अडचणींवर मात करत, श्री. विठ्ठल वैद्य यांच्या मार्गदर्शनातून SRT तंत्राचा शास्त्रीय अवलंब स्वीकारून त्यांनी आपल्या शेतीला नवी दिशा दिली. SRT पद्धतीमुळे त्यांच्या उत्पादनात ठोस वाढ झाली — कापूस उत्पादन ७–८ वरून ९–१० क्विंटल प्रति एकरपर्यंत पोहोचले, तर मका उत्पादन १२–१५ क्विंटलपर्यंत मिळाले. एकदाच खत देऊनही त्यांनी चांगले उत्पादन घेतले.

भूमीची सुपीकता वाढवून विषमुक्त अन्ननिर्मितीचा मार्ग त्यांनी कृतीतून दाखवून दिला आहे. घरगुती कीटकनाशकांच्या वापरामुळे खर्चात बचत झाली. त्यांच्या प्रयोगशील शेतीची दखल घेऊन कृषी अधिकारी व शास्त्रज्ञांनी त्यांना दोन वेळा पुरस्कार देऊन गौरविले आहे. अनेक शेतकरी त्यांच्या शेताला भेट देऊन मार्गदर्शन घेतात. SRT तंत्राच्या प्रसारातून ग्रामीण समृद्धी साधावी आणि ही पद्धत शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी, हेच त्यांचे ध्येय आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



## ५.

### श्रीमती उषा सुधाकर देवरे

मु.गोंदेगाव, ता. जामनेर,
जि. जळगाव,
मो. 95189 22756

SRT शेती स्वीकारल्यानंतर त्यांच्या शेतीत मोठा सकारात्मक बदल दिसून आला. SRT शेती म्हणजे खर्च कमी, उत्पन्न डबल, कमी पाण्यातही पीक चांगले येते, रासायनिक खत कमी लागते — हे त्यांनी स्वतःच्या अनुभवातून सिद्ध केले. त्यांच्या शेतातील जमीन भुसभुशीत झाली, गांडुळांची संख्या वाढली आणि विहिरीतील पाण्याची पातळीही उंचावली.

२०२३ पर्यंत त्यांनी रब्बी हंगाम घेतला नव्हता; परंतु SRT शेतीमुळे २०२४ मध्ये रब्बीतच ₹३.२० लाखांचे उत्पादन घेतले. यावर्षी ₹ ४–५ लाख उत्पन्नाची अपेक्षा आहे. तेही खर्च कमी, मेहनत कमी आणि उत्पन्न दुप्पट या तत्त्वावर.

SRT टीमने विकसित केलेल्या या तंत्रज्ञानाबद्दल त्या मनापासून कृतज्ञता व्यक्त करतात. या पद्धतीमुळे जमिनीत झालेला सकारात्मक बदल आणि वाढलेले उत्पादन पाहता, "याबद्दल जितकं बोलावं तितकं कमीच," असे त्या अभिमानाने सांगतात.



# ६.

## डॉ. एस. डी. सोमवंशी


**कार्यक्रम समन्वयक KVK**

बदनापूर,
जि. जालना,
मो. 94049 57356


हे आपल्या कार्यक्षेत्रात SRT पद्धतीचा प्रभावी प्रसार करणारे प्रगतिशील कृषी शास्त्रज्ञ व मार्गदर्शक आहेत. त्यांच्या मते SRT भात लागवड पद्धत शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली असून पावसाळ्यात शेतातील उपयुक्त माती वाहून जात नाही आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते. मजुरांची कमतरता लक्षात घेता ही पद्धत खर्च बचतीसाठी फायदेशीर ठरते, कारण चिखलणी व लागवडीवरील खर्चात मोठी बचत होते. तसेच SRT बेड पद्धतीमुळे रब्बी हंगामात विविध पिके सहज घेता येतात आणि जमिनीचा कार्यक्षम वापर होतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शेतकरी SRT स्वीकारत असून शाश्वत, नफ्याची व पर्यावरणपूरक शेतीकडे वाटचाल करत आहेत.



७.

## सौ. मीरा राजेभाऊ काळे

मु. बाबुलतारा, ता. परतूर,
जि. जालना,
मो. 97646 42677

"गे माय भू, तुझे मी फेडीन पांग सारे..." या भावनेने भूमातेची सेवा करण्याचा मिरताईंचा संकल्प आहे. जन्म देणाऱ्या आईप्रमाणेच भूमातेचे आरोग्य जपण्याची संधी त्यांना SRT तंत्रामुळे मिळाली. गेल्या दोन वर्षांपासून त्या SRT पद्धतीने शेती करत असून वेळ, पैसा व मजुरीची बचत झाल्याचा त्यांचा अनुभव आहे.

पारंपरिक शेतीत महिलांना तणांचा मोठा त्रास व्हायचा; मात्र योग्य तण व्यवस्थापनामुळे ती चिंता दूर झाली. खोड-मूळ जमिनीत ठेवल्याने गांडुळे वाढली. बेड पद्धतीमुळे पाणी मुरले, ओलावा टिकला आणि पीक चांगले आले. त्यामुळे भूमाता अधिक सुपीक झाली.

त्या व त्यांच्या पतीने ५ एकर ऊस एकही मजूर न लावता केला. आज त्या १४ एकरांवर SRT शेती आनंदाने करतात. ऊस, कापूस, तूर, सोयाबीन, बाजरी, मका अशी फेरपालट पिके घेतात. एकट्याने ४ एकर कापूस घेऊन एकरी १० क्विंटल उत्पादन घेत सुमारे ₹४०,००० खर्च वाचवला. सकस व जिवंत माती हीच शाश्वत शेतीची खरी पायाभरणी आहे. "सुदृढ माती, फायद्याची शेती — होय, मी SRT शेतकरी," असे त्या अभिमानाने सांगतात.



# ८.

## श्री. वामन पदु कडाळी

मु. कुडेरान, ता. अंबरनाथ,
जि. ठाणे,
मो. 90119 68582

हे कोकणातील अल्पभूधारक शेतकरी असून गेली सहा वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. खरीप हंगामात ते भात घेतात, तर रब्बी हंगामात कडधान्ये आणि विविध भाजीपाला पिके घेतात. कर्जत (रायगड) येथील SRT चे अग्रगण्य शेतकरी श्री. परशुराम आगिवले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी ही पद्धत स्वीकारली. SRT मुळे त्यांच्या जमिनीचा पोत भुसभुशीत व सच्छिद्र झाला असून भातशेतीत गांडुळांची वाढलेली हालचाल त्यांनी प्रत्यक्ष पाहिली आहे—जी पारंपरिक चिखलणी भातशेतीत क्वचितच दिसते. उत्पादनात वाढ झाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. ते आपल्या परिसरात SRT चा प्रसार करून इतर शेतकऱ्यांनाही शाश्वत शेतीकडे प्रेरित करत आहेत.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# ९.

## श्री. विलास मनोहर झुंझारराव


**कृषी अधिकारी पंचायत समिती**

ता. शहापुर,
जि. ठाणे,
मो. 70838 88596


हे शेतकरी नसून आपल्या कार्यक्षेत्रात SRT पद्धतीचा प्रसार करणारे सक्रिय व समर्पित कृषी अधिकारी आहेत. त्यांच्या मते SRT भात लागवड पद्धत ही शेतकरी वर्गासाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरली आहे, कारण पावसाळ्यात शेतातील उपयुक्त माती वाहून जात नाही आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते. मजुरांची वाढती कमतरता लक्षात घेता ही पद्धत अत्यंत फायदेशीर असून चिखलणी व लागवडीवरील खर्चात मोठी बचत होते. तसेच SRT बेड पद्धतीमुळे रब्बी हंगामात विविध प्रकारची पिके सहज घेता येतात. आपल्या प्रभावी मार्गदर्शन व विस्तार कार्यामुळे त्यांनी शहापूर परिसरात SRT चा प्रसार करून अनेक शेतकऱ्यांना शाश्वत व नफ्याची शेती करण्यास प्रेरित केले आहे.



# १०.

## श्री. पंकज लोटन देसले

मु. वैजाली, ता. शाहदा,
जि. नंदुरबार,
मो. 98811 35092

पारंपरिक ६ एकरांच्या ऊस शेतीत उत्पादन वर्षागणिक घटत गेल्याने त्यांनी पर्याय शोधला. SRT विषयावरील व्हिडिओ पाहून माहिती घेतली आणि ही पद्धत स्वीकारली. या तंत्रात आधी जमीन सक्षम करणे महत्त्वाचे आहे, हे त्यांना उमगले. त्यामुळे उत्पादन खर्चात बचत झाली.

जमिनीची सुपीकता वाढली, सेंद्रिय कर्ब सुधारला आणि मातीची पोत भुसभुशीत झाली. जमीन पुन्हा जिवंत झाल्याचा अनुभव त्यांनी घेतला. एकही मजूर न लावता ऊस शेती करणे शक्य झाले. तण व्यवस्थापनामुळे गवताचा त्रास कमी झाला.

खोड व मुळे जमिनीत ठेवल्याने गांडुळे वाढून सुपीकता अधिक दृढ झाली. “आधी पिकावर काम करत होतो, आता जमिनीवर काम करतो,” असा त्यांचा अनुभव आहे. कमी खर्चात सातत्याने चांगले उत्पादन देणारी ऊस शेती या पद्धतीतच शक्य असल्याचा त्यांचा ठाम विश्वास आहे.



# ११.

## श्री. शंकर गोविंदा गायकवाड

मु. म्हैसखडक, ता. सुरगाणा,
जि. नाशिक,
मो. 87678 80783

श्री. शंकर गोविंदा गायकवाड यांनी SRT पद्धतीचा ५ वर्षे अवलंब करून आपल्या शेतीत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. त्यांच्या शेतात भात, नाचणी (नागली), वरई, उडीद, तूर, हरभरा, वराणा मिरची, सफेद मुसळी तसेच प्रायोगिक तत्वावर चिया सीड्स ही विविध पिके घेतली जातात. नाचणीचे प्रति गुंठा सुमारे ९५ किलो उत्पादन, मिरची सव्वा गुंठ्यातून वाळवून १ क्विंटल ६५ किलो आणि सफेद मुसळीचे ७ गुंठ्यातून १०२ किलो उत्पादन घेऊन सुमारे ₹१.३८ लाखांचे उत्पन्न त्यांनी मिळवले आहे.

कारकिर्दीच्या सुरुवातीला हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे भात शेती जवळपास ७०% अपयशी ठरली आणि टीकाही सहन करावी लागली. मात्र श्री. बाळूदादांच्या आग्रहाने SRT स्वीकारले आणि SRT तंत्राच्या टीम च्या मार्गदर्शनातून त्यांना नवी दिशा मिळाली.

चिकाटी, प्रयोगशीलता आणि सातत्य यांच्या जोरावर त्यांनी शेतीत स्थैर्य मिळवले आहे. आज ते आनंदी व यशस्वी शेतकरी असून आपले अनुभव इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत मार्गदर्शनही करतात.

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

# १२.



## श्री. केशव आश्रुबा गिराम

मु. गोपेगाव, ता. पाथरी,
जि. परभणी,
मो. 95790 82456

केशव गिराम हे गेली ३ वर्षे एसआरटी पद्धतीने शेती करत आहेत. एसआरटी पद्धतीने ते कापूस, तूर, सोयाबीन अशी पिके घेतात. त्यांनी एकूण ३.५ एकर क्षेत्रावर एसआरटी पद्धतीने शेती केली आहे. एसआरटी पद्धतीने शेती केल्याने त्यांना उत्पादनात २ ते ४ क्विंटल वाढ झाल्याचा अनुभव आहे. त्यांनी दादाच्या अनुभवातून प्रेरणा घेतली आणि एसआरटी पद्धतीने शेती करण्यास सुरुवात केली. एसआरटी मुळे रासायनिक खतांचा वापर कमी झाला आहे आणि उत्पादनात वाढ झाली आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची

१३.



## सौ. कीर्ती केशव नगरे

मु. थोरातवाडी ता. इंदापूर,
जि. पुणे,
मो. 72766 29788

या २०२२ पासून SRT पद्धतीने शेती करत आहेत. त्या सोयाबीन, हरभरा व तूर ही पिके SRT तंत्राने घेतात. बदलत्या हवामानातही नियोजनबद्ध शेती करण्यावर त्यांचा भर असतो. चालू खरीप हंगामात ६ जून २०२५ रोजी लागवड केलेल्या पावणे दोन एकर तुरीतून १९ क्विंटल ४८ किलो उत्पन्न मिळाले, म्हणजे एकरी सुमारे ११ क्विंटल उत्पादन मिळाले. अतिवृष्टीतही गादीवाफ्यांमुळे पिकांचे नुकसान टळले. हे उत्पादन SRT च्या परिणामकारकतेचे उदाहरण असल्याचे त्या सांगतात. त्यांच्या मते SRT मुळे जमिनीची सुपीकता व सेंद्रिय कर्ब वाढतो आणि रासायनिक खतांची गरज कमी होते. पिकांची रोगप्रतिकारशक्ती वाढून गुणवत्ता सुधारते व उत्पादन स्थिर राहते. सर्वसामान्य शेतकऱ्यांना आर्थिक बळ देणारे SRT तंत्र हे शेतीसाठी वरदान असल्याचा त्यांचा विश्वास आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# १५.

## श्री. शिवाजी ज्ञानोबा बादाडे

मु. काडी वडगाव, ता. वडवणी,
जि. बीड,
मो. 90490 38544

शिवाजी बादाडे हे गेली पाच वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. ते कापूस, सोयाबीन, बाजरी, गहू तसेच काही प्रमाणात खोडवा ऊस घेतात. नव्या तंत्रांचा स्वीकार करून शेती अधिक सक्षम करण्यावर त्यांचा भर आहे. ते १० एकर क्षेत्रावर सातत्याने SRT शेती करतात. उर्वरित १० एकर ऊस क्षेत्रातही खोडवा उसासाठी सोयीनुसार SRT तंत्र वापरतात. या पद्धतीत कापसाचे एकरी १७.५० क्विंटल तर सोयाबीनचे सरासरी १० ते १३ क्विंटल उत्पादन मिळाले असून जमिनीचा कस सुधारून उच्च दर्जाचे उत्पादन मिळत असल्याचा त्यांचा अनुभव आहे. त्यांच्या मते, “SRT शेती ही मजूर टंचाईमुळे होणारा मानसिक त्रास कमी करणारी पद्धत आहे.” सेंद्रिय कर्ब वाढल्याने मातीचा पोत सुधारतो, मशागतीचा व खतांचा खर्च कमी होतो आणि शेती अधिक किफायतशीर बनते. त्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.



# १५

## श्री. स्वप्नील दिपक महाजन

मु. चिखली, ता. चिखली,
जि. बुलढाणा,
मो. 99225 21521

स्वप्नील महाजन यांनी SRT शेतीची दोन वर्षे पूर्ण करून तिसऱ्या वर्षात प्रवेश केला आहे. शून्य मशागत तंत्राच्या अनुभवावर त्यांनी वर्षभर विविध हंगामातील पिके घेतली आहेत. नव्या तंत्रामुळे मिळालेल्या यशाने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. ते खरीपमध्ये सोयाबीन, सोयाबीन-तूर, तूर-उडीद-मूग व तूर ही पिके घेतात. रब्बीत मका व गहू घेत असून यावर्षी उन्हाळी तीळाची लागवडही केली आहे. पिकांच्या फेरपालटीमुळे मातीची कणरचना सुधारते, ओलावा टिकतो आणि बेड पद्धतीने पाण्याचा योग्य निचरा होतो, असा त्यांचा अनुभव आहे. SRT तंत्राची खात्री पटल्याने त्यांनी २३ एकर संपूर्ण क्षेत्रावर ही पद्धत राबवली आहे. त्यांच्या मते SRT पद्धत कोणत्याही पिकासाठी सुरक्षित व परिणामकारक ठरते. नियोजनबद्ध SRT शेतीमुळे धोके कमी होऊन उत्पादनात स्थैर्य येते, असे ते सांगतात.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# १६

## श्री. गोपाळ शंकर झगडे

मु. अडूर, ता. गुहागर,
जि. रत्नागिरी,
मो. 94208 42745

हे कोकणातील अल्पभूदारक शेतकरी असून गेली आठ वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. ते प्रामुख्याने भात व विविध कडधान्ये SRT बेडवर घेतात. या पद्धतीमुळे त्यांच्या उत्पादनात दुप्पट वाढ झाली असून उत्पादन खर्च निम्म्यावर आला आहे, असा त्यांचा अनुभव आहे. जमिनीची सुपीकता सुधारल्यामुळे पिकांची पौष्टिकता वाढली असून शेतमालाची चव अधिक गोड व नैसर्गिक लागते. SRT मुळे आर्थिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि समाधान मिळाल्याने ते अत्यंत आनंदी व प्रेरित शेतकरी म्हणून उभे आहेत.

१७



## श्री. रामचंद्र देहू हाबळे

मु. पोशीर, ता. कर्जत,
जि. रायगड,
मो. 99230 63856

रामचंद्र हाबळे हे गेली सात वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. त्यांनी शून्य मशागत तंत्र सातत्याने राबवले आहे. नियोजनबद्ध शेतीमुळे त्यांना चांगले परिणाम मिळाले आहेत.

ते प्रामुख्याने खरीप भात व त्यानंतर कुळीथ हे पीक घेतात. सन २०२४ मध्ये भात पिकात हेक्टरी ७१ क्विंटल २५ किलो असे उच्चांकी उत्पादन मिळाले. भाताच्या रोपांची पाने रुंद व तजेलदार दिसली आणि शेतात नैसर्गिक गांडूळांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचा त्यांचा अनुभव आहे.

त्यांच्या मते रोपांच्या बुडाशीच गांडूळखत तयार होत राहिल्याने पिकांना सतत पोषण मिळाले आणि त्यामुळे विक्रमी उत्पादन मिळाले. SRT मुळे कष्ट कमी होतात, जमिनीची धूप थांबते आणि सुपीकता वाढते. कमी खर्चात जास्त उत्पादन मिळून वेळ, पैसा व श्रम यांची मोठी बचत होते. कोकणातील शेतकऱ्यांनीही खरीपातील भात शेतीसाठी SRT तंत्र जरूर वापरावे, असा त्यांचा कळकळीचा सल्ला आहे.

# १८



## श्री. अरुण पंढरीनाथ तांडेल

मु. जामरुंग, ता. कर्जत,
जि. रायगड,
मो. 96070 08856

हे कोकणातील प्रगतिशील शेतकरी असून गेली काही वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. खरीप हंगामात ते भात पिक घेतात, तर रब्बी हंगामात कडधान्ये व भाजीपाला अशी विविध पिके SRT बेड पद्धतीने घेतात. या पद्धतीमुळे त्यांच्या जमिनीचा पोत भुसभुशीत व सच्छिद्र झाला असून गांडुळांची संख्या वाढल्याचे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे, जे पारंपरिक चिखलणी भातशेतीत सहसा दिसत नाही. SRT मुळे उत्पादनात वाढ झाली असून खर्चात बचत झाली आहे, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. ते आपल्या परिसरात SRT चा प्रसार करून इतर शेतकऱ्यांना शाश्वत, पर्यावरणपूरक व नफ्याची शेती करण्यासाठी प्रेरित करत आहेत.



# १९

## श्री. दत्तात्रय दगडू जंगाले

मु. पोमादेवी (जवळगा), ता. औसा,
जि. लातूर,
मो. 82084 00812

दत्तात्रय जंगले हे गेली तीन वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. सध्या ते पाच एकर क्षेत्रावर ही पद्धत राबवत आहेत. प्रयोगशीलतेमुळे त्यांनी SRT तंत्र आत्मविश्वासाने स्वीकारले आहे. सोयाबीन, तूर, उडीद, मूग आणि ऊस ही पिके ते घेतात. त्यांना तूर एकरी ७ क्विंटल आणि सोयाबीन एकरी ८ क्विंटल असे विक्रमी उत्पादन मिळाले आहे. गादीवाफ्यांवर पुरेसा वापसा ( ओलावा) राहतो आणि मुळांशी सुयोग्य प्रमाणात प्राणवायू उपलब्ध होतो त्यामुळे विविध पिकांत उत्तम उत्पन्न मिळत असल्याचा त्यांचा अनुभव आहे. त्यांच्या मते SRT मुळे कमी खर्चात जास्त उत्पादन मिळते. मजुरी, ट्रॅक्टर व इंधनाचा खर्च कमी झाला, मातीची धूप थांबली आणि जमिनीची सुपीकता वाढली. आज ‘प्रगतशील शेतकरी’ म्हणून ओळख निर्माण झाल्याचा त्यांना अभिमान आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# २०

## श्री. राजाभाऊ वैकुंठराव देशमुख

मु. पाचोड, ता. आर्वी,
जि. वर्धा,
मो. 89754 64802

राजाभाऊ देशमुख यांनी SRT पद्धतीचा ६ वर्षे अवलंब करून त्यांच्या १४ एकर शेतीत सकारात्मक बदल घडवले आहेत. कमी खर्चात जास्त उत्पादन मिळाल्याचा त्यांचा अनुभव आहे. सशक्त पिकामुळे रोग कमी आले. त्यामुळे विषारी कीटकनाशक औषधांवरील खर्चातही लक्षणीय बचत झाली आहे. त्यांच्या मते SRT मुळे मजुरांचा खर्च कमी झाला. मातीची धूप थांबून मातीच्या कणरचनेत सुधारणा झाली आणि जमीन अधिक सुपीक बनली. त्यामुळे पिके जोमदार व भरघोस आली. रासायनिक खते देण्याची गरजही कमी होत आहे. ट्रॅक्टरचा वापर कमी झाल्याने इंधनाची बचत झाली आणि पर्यावरणाची जोपासना शक्य झाली. "SRT मुळे माझी प्रगतशील शेतकरी म्हणून ओळख निर्माण झाली. आज शेतकरी असल्याचा अभिमान वाटतो" असे ते अभिमानाने सांगतात.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# २१

## श्री. विद्याधर बबनराव शिंदे

मु. बेलावडे, ता. जावळी,
जि. सातारा,
मो. 98209 24376

विद्याधर शिंदे हे गेली तीन वर्षे साधारण दीड एकर क्षेत्रावर SRT पद्धतीने शेती करत आहेत. नांगरणी, चिखळणी व लावणी नसलेले, खर्चाची आणि त्रासाची कपात असलेले एस आर टी हे विविध पीक लागवडीचे नवीन तंत्र ते राबवत आहेत. ते भात, सोयाबीन, घेवडा, भुईमूग आणि हरभरा ही पिके घेतात., कमी क्षेत्रातही नियोजनबद्ध शेती करून चांगले परिणाम मिळवत आहेत. पिकांचा फेरपालट केल्याने कीटकांचा उपद्रव कमी होत असल्याचा त्यांचा अनुभव आहे. त्यामुळे पिके निरोगी राहून उत्तम उत्पादन मिळते. त्यांच्या मते SRT शेतीमुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पन्न फायदेशीर ठरते. जमिनीचा पोत सुधारून माती अधिक सुपीक होत आहे. प्रत्येक पिकात समाधानकारक व वाढीव उत्पादन मिळत असल्याचे ते सांगतात. सर्व शेतकरी मित्रांनी एस आर टी तंत्र अवलंबावे असे ते सांगणे सांगतात.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



२२

## श्री. महारु तुळशीराम जाधव

मु. तोरण डोंगरी, ता. सुरगाणा,
जि. नाशिक,
मो. 90118 92315

महारु जाधव हे मागील पाच वर्षांपासून साधारण दोन एकर क्षेत्रात SRT पद्धतीने शेती करत आहेत. ही नवी पद्धत स्वीकारून शेती सुधारण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. खरीप हंगामात ते भात, नागली आणि काही प्रमाणात उडीद ही पिके घेतात व हवामानाला अनुरूप पिकनिवड करतात. SRT मुळे कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळू लागले. नांगरणी व गाळ करणे ही कामे बंद झाली, जमिनीची धूप थांबली आणि एकूण खर्च घटला. मजुरांवरील अवलंबित्व कमी होऊन वेळेची बचत होते. त्यांच्या मते शून्य मशागतीमुळे पीक लवकर तयार होते व बाजारात आधी विक्री करता येते, त्यामुळे चांगली किंमत मिळते. त्यांच्या शब्दांत — “SRT शेती पद्धतीने मला उत्पादनाचा खूप चांगला अनुभव आला आणि शेती अधिक फायद्याची वाटू लागली.”

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची

# २३



## श्री. दिनकर संजयराव काळे

मु. बाबुलतारा, ता.परतूर,
जि. जालना,
मो. 72188 47710

दिनकर संजयराव काळे हे गेल्या तीन वर्षांपासून सगुणा रिजनरेटिव्ह तंत्रज्ञान (SRT) पद्धतीने शेती करत आहेत. त्यांनी स्वतःच्या १६ एकर क्षेत्रावर पूर्णपणे SRT अवलंबले असून गावातील इतर शेतकऱ्यांसह सुमारे ६० एकरांवर ही पद्धत राबविली जात आहे. कापूस (११ क्विंटल/एकर), तूर (९ क्विंटल/एकर), सोयाबीन (१० क्विंटल/एकर) आणि हरभरा (७ क्विंटल/एकर) अशी विक्रमी उत्पादन त्यांनी घेतली आहेत, तर ऊस, गहू आणि उन्हाळी बाजरी यांचे अंतिम उत्पादन काढणीनंतर कळविण्यात येईल. त्यांच्या मते SRT शेती अतिशय कमी खर्चात आणि कमी कष्टात होते. या पद्धतीमुळे जमिनीची सुपीकता वाढते, क्षारता कमी होते आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते. मातीची कणरचना सुधारून जैवभार जागेवर कुजल्यामुळे गांडुळे, उपयुक्त बुरशी व जिवाणूंची संख्या वाढते आणि मातीला नैसर्गिक मृदू सुगंध येतो. पर्यावरण संतुलन राखत शाश्वत व विषमुक्त शेतीसाठी SRT ही अत्यंत उपयुक्त पद्धत असल्याचा त्यांचा ठाम अनुभव आहे.



# २४

## श्री. प्रकाश गणपतराव खोब्रागडे

मु. मारोडा, ता. मूल,
जि. चंद्रपूर,
मो. 94207 53605

हे २०१५ पासून SRT पद्धतीने शेती करत असून कापूस पिकात प्रथमच SRT स्वीकारणारे पथदर्शक शेतकरी म्हणून ओळखले जातात. SRT पद्धतीने कापूस घेण्याचे धाडस करून त्यांनी या तंत्राची यशस्वी अंमलबजावणी केली आणि त्यामुळे ते SRT कापूस शेतीचे पथदर्शक शेतकरी ठरले. कापसाबरोबरच ते भात, हरभरा व मका ही पिकेही SRT बेडवर घेत आहेत. या पद्धतीमुळे त्यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असून उत्पादन खर्चात मोठी घट झाली आहे. रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर कमी झाल्याने शेती अधिक शाश्वत व पर्यावरणपूरक झाली आहे. SRT मुळे आर्थिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि समाधान मिळाल्याचे ते आनंदाने सांगतात.



# २५

## श्री. नागेंद्र रेड्डी

जि. सत्यसाई,
राज्य - आंध्र प्रदेश,
मो. 94942 19473

हे गेल्या दोन वर्षांपासून SRT पद्धतीने मका पिकवत असून त्यांना चांगले उत्पादन आणि लक्षणीय खर्च बचत अनुभवास आली आहे. सध्या ते १.५ एकर क्षेत्रावर SRT अवलंबून शेती करत आहेत. पारंपरिक पद्धतीत दूणगणी व तव्वींग यांसारखी मशागत करावी लागते; मात्र SRT मध्ये या प्रक्रिया टाळल्या जात असल्याने श्रम व खर्च दोन्ही कमी होतात. त्यांच्या अनुभवात SRT मुळे सुमारे १४% खर्च कमी झाला असून उत्पादनात १५% ते २०% वाढ झाली आहे. मागील हंगामात सुमारे ५०,००० रुपये उत्पन्न मिळाले, १६,००० रुपये खर्च वजा जाता ३४,००० रुपयांचा नफा झाला; पारंपरिक पद्धतीत हा नफा केवळ सुमारे १५,००० रुपये राहिला असता. त्यामुळे SRT ही अधिक फायदेशीर, श्रमबचत व उत्पन्नवाढ करणारी पद्धत असल्याचा त्यांचा ठाम अनुभव आहे.



२६

## श्री. भगवान रेड्डी

जि. करीमनगर,
राज्य. तेलंगणा,
मो. 98491 25635

हे SRT पद्धतीने गेल्या काही वर्षांपासून शेती करत असून सध्या २ एकर क्षेत्रावर कापूस व भाजीपाला पिके घेत आहेत. कापूस पिकात SRT अवलंबल्यानंतर त्यांच्या उत्पादन खर्चात लक्षणीय घट झाली असून उत्पादनात वाढ झाली आहे. रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर कमी झाल्यामुळे शेती अधिक शाश्वत आणि नफ्याची ठरली आहे. SRT पद्धतीने त्यांनी एकरी सुमारे १५ क्विंटल कापसाचे उत्पादन घेतले आहे. त्यांच्या शेतातील सकारात्मक परिणाम पाहण्यासाठी अनेक शेतकरी भेट देत असून ते आत्मविश्वासाने SRT चे मार्गदर्शन करत आहेत. SRT मुळे ते अत्यंत आनंदी आणि समाधानी शेतकरी बनले आहेत.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



## गोविंद नेवजू धूम

मु. बिलधा, धरमपूर,
राज्य. गुजरात
मो. 96244 79616

हे गेल्या तीन वर्षांपासून SRT पद्धतीने शेती करत असून आपल्या जिल्ह्यात SRT अवलंबणारे पहिले शेतकरी म्हणून ओळखले जातात. त्यांनी सुरुवातीला अर्ध्या एकरावर धानाची लागवड करून प्रयोग केला आणि आज एकूण १.२० एकर क्षेत्रावर SRT राबवत आहेत. ते भात, सफेद मुसळी, उडीद व चना अशी पिके घेत असून विशेषतः भातामध्ये त्यांना विक्रमी व दुप्पट उत्पादन मिळाले आहे. सुरुवातीला लोकांनी शंका घेतली, टिंगल-टवाळीही केली; मात्र प्रत्यक्षात वाढलेले उत्पादन पाहून ते स्वतः आणि इतर शेतकरीही आश्चर्यचकित झाले. SRT मुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला असून आज ते या पद्धतीचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहेत.



# २८

## श्री. अभिनंदन अजित सौंदत्ते

मु. हुपरी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर
मो. 84469 74665

अभिनंदन सौंदत्ते हे गेली चार वर्षे SRT पद्धतीने शेती करत असून तंबाखू पिकातही प्रथमच SRTचा यशस्वी प्रयोग केला आहे. त्यांनी भुईमूग, गहू, मूग, भात, ऊस, हरभरा, कांदा, मका आणि तंबाखू अशी विविध पिके घेतली असून संपूर्ण २० एकर क्षेत्रावर SRT शेती अवलंबली आहे. त्यांच्या अनुभवात या पद्धतीमुळे सूक्ष्मजीवांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून सेंद्रिय कर्बाचे प्रमाणही वाढले आहे, ज्यामुळे पिकांच्या पानांवर विशेष तेज दिसून येते. जमिनीची धूप पूर्णपणे थांबली असून कितीही पाऊस पडला तरी पाणी जमिनीत मुरते आणि जमीन कायम वापसा स्थितीत राहते. या सर्व सकारात्मक बदलांमुळे पिकांचे उत्पादन जवळपास दुप्पट झाले असून ते SRT शेतीमुळे अत्यंत आनंदी व समाधानी आहेत.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



२९

## श्री. रामचंद्र प्रभाकर पुंड

मु. बाजार सावंगी. ता. खुलताबाद,
जि. छत्रपती संभाजीनगर
मो. 9860821601

नैराश्य आणि कर्जाच्या तणावात असताना त्यांना एस आर टी तंत्र मिळाले आणि त्यांच्या जीवनात मोठा बदल झाला. ते सांगतात की एस आर टी नसते तर कदाचित आज मी आपल्यासोबत नसतो. एस आर टी तंत्रामुळे त्यांचे कुटुंब शेतीतून आनंदी व आत्मनिर्भर झाले आणि समाजात प्रतिष्ठा मिळाली.

हे त्यांचे एस आर टीचे पाचवे वर्ष आहे. ५ एकर क्षेत्रावर मका, कापूस, ऊस, गहू, कांदा, लसूण आणि हरभरा पिके घेतात. एस आर टी पद्धतीवर त्यांनी अतिउत्तम प्रतीचा ऊस घेतला आहे, याची विशेष नोंद घ्यावी.

काळ्या आईवरील नांगरणीचे अत्याचार त्यांनी थांबवले. शेतात बाराही महिने गांडुळे व सूक्ष्मजीव वाढले. माती हलकीफुलकी झाली, कष्ट कमी झाले आणि अशी पिके त्यांनी पूर्वी कधी पाहिली नव्हती. पिढ्यान् पिढ्या अंधकार दूर करून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणणारे हे तंत्र आहे. शेती ही करायची नसून शिकायची गोष्ट आहे हे त्यांना गुरूमुळे उमगले. ते एकच संदेश देतात, एस आर टी तंत्र शिका, समजून वापरा आणि आयुष्याचे कल्याण करा.

नैराश्य आणि कर्जाच्या तणावात असताना त्यांना SRT तंत्र मिळाले आणि त्यांच्या जीवनात मोठा बदल झाला. ते सांगतात की हे तंत्र नसते तर कदाचित आज मी आपल्यासोबत नसतो. या पद्धतीमुळे त्यांचे कुटुंब शेतीतून आनंदी व आत्मनिर्भर झाले आणि समाजात प्रतिष्ठा मिळाली.

पिढ्यान् पिढ्यांचा अंध:कार दूर करून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणणारे हे तंत्र आहे. ‘शेती ही करायची नसून शिकायची गोष्ट आहे’ हे त्यांना उमगले. ते एकच संदेश देतात, SRT तंत्र शिका, समजून वापरा आणि आयुष्याचे कल्याण करा.

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

# ३०



## श्री. वेंकटराव मलेला

जि. हैदराबाद,
मो. 90300 23230

हे SRT झेबू मशीनचे विकसक असून त्यांनी शून्य मशागत आधारित रिजनरेटिव्ह शेतीसाठी अत्यंत उपयुक्त अशी बहुउद्देशीय यंत्रणा विकसित केली आहे. या SRT झेबू मशीनद्वारे बेड तयार करणे, बियाण्यांची पेरणी, फवारणी, मल्चिंग तसेच काढणीपर्यंतची विविध कामे एकाच प्रणालीतून करता येतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च, मजुरीवरील अवलंबित्व आणि वेळ मोठ्या प्रमाणात वाचतो. SRT तत्त्वांनुसार जमिनीची मशागत न करता अचूक व कार्यक्षम शेती व्यवस्थापन करण्यासाठी हे यंत्र विशेष उपयुक्त ठरत आहे. या नवकल्पनेमुळे लघु व मध्यम शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची साथ मिळून SRT शेती अधिक वेगाने व व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होत आहे. त्यांच्या या अभिनव योगदानामुळे SRT च्या यांत्रिकीकरणाला नवे बळ मिळाले आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# ३१

## श्री. परशुराम तातू आगिवले

मोग्रज, ता. कर्जत,
जि. रायगड
मो. 91723 32629

हे भीमाशंकर डोंगराच्या पायथ्याशी राहणारे आदिवासी ठाकूर समाजातील प्रगतिशील शेतकरी असून गेली सुमारे १२ वर्षे SRT पद्धतीने शेती करत आहेत. शेतीची प्रचंड आवड असल्यामुळे त्यांनी गावातील घर सोडून शेतावरच झोपडीवजा घर बांधले असून पत्नी इंदू आणि मुली प्रगती व आदिती यांच्यासह तेथेच वास्तव्यास आहेत. SRT तंत्रामुळे त्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल झाला असून समाजात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. दरवर्षी ते किमान तीन पिके घेतात, तर रब्बी हंगामात २ एकर क्षेत्रात २०-२५ प्रकारची कडधान्ये व भाजीपाला घेतात आणि हे सर्व काम कुटुंबाच्या मदतीनेच करतात. तयार भाजीपाला ते स्वतः टेम्पोने गावोगावी विकतात, त्यामुळे त्यांना रोख उत्पन्न मिळते आणि कर्जत-कशेळे परिसरात "मोग्रजची ताजी भाजी" म्हणून त्यांचे नाव प्रसिद्ध झाले आहे. पूर्वी ज्या जमिनीतून १५-२० पोती भात व अल्प उत्पन्न मिळत होते, त्याच जमिनीतून आता ३५-४० पोती भात व वार्षिक सुमारे ३ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू लागले आहे. या आर्थिक स्थैर्यामुळे त्यांच्या मुलींना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले असून SRT मुळे मिळालेला आत्मविश्वास, प्रतिष्ठा व आनंद संपूर्ण आदिवासी समाजात प्रेरणादायी ठरत आहे. प्रयोगशील वृत्ती जपत त्यांनी यावर्षी कोकणात प्रथमच SRT पद्धतीने बटाटा लागवड करून अर्ध्या गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्रातून ८ किलो बियाण्यांपासून सुमारे ७० किलो बटाट्यांचे भरघोस उत्पादन घेतले आहे.



# ३२

## डॉ. गणेश श्रीरंग पोटे

मु. वालसा वडाळा, ता. भोकरदन,
जि. जालना
मो. 80071 55044

गणेश श्रीरंग पोटे हे गेल्या पाच वर्षांपासून कृषी-रत्न भडसावळे दादा यांच्या SRT तंत्राने आपल्या १२ एकर क्षेत्रावर शेती करत आहेत. SRT पद्धतीमध्ये नांगरणी, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, कोळपणी किंवा निंदणी यांची गरज नसल्यामुळे त्यांच्या शेतीखर्चात सुमारे ५०% बचत झाली असून पारंपारिक शेतीपेक्षा उत्पादनात जवळपास ४०% वाढ झाली आहे. ते सोयाबीन, तूर, कपाशी, मका, भुईमूग, टोमॅटो, उडीद, मूग इत्यादी विविध पिके घेत असून उत्तम उत्पादनाचा अनुभव घेत आहेत. पूर्वी त्यांच्या शेतातील ४९४ फूट व ३६५ फूट अशा दोन बोअरवेल केवळ अर्धा ते पाऊण तास पाणी देत होत्या; परंतु SRT तंत्रामुळे पिकांचे अवशेष जमिनीतच कुजून पोकळ्या तयार झाल्या, गांडुळांची संख्या वाढली आणि जमीन भुसभुशीत झाली. परिणामी जमिनीत जलसाठा मोठ्या प्रमाणात वाढून आज दोन्ही बोअरवेलमध्ये मुबलक पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे त्यांची कोरडवाहू शेती बागायतीत रूपांतरित झाली असून ते अत्यंत समाधानी व आनंदी आहेत.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# ३३


## श्री. उमेश गोविंदराव पोहदरे

मु. येवती, पो. धानोरा, ता. राळेगाव,
जि. यवतमाळ
मो. 9767515410


हे गेली पाच वर्षे SRT पद्धतीने २८ एकर ओलीत क्षेत्रावर शेती करत आहेत. कापूस, तूर, सोयाबीन, चना, ज्वारी, गहू तसेच रब्बी तूर अशी विविध पिके ते घेत असून त्यांनी उल्लेखनीय विक्रमी उत्पादन मिळवले आहे. २०२६ मध्ये सोयाबीन एकरी १६ क्विंटल, २०२३ मध्ये चना १५ क्विंटल, २०२४ मध्ये कापूस १५ क्विंटल असे उत्पादन झाले असून यावर्षीही चन्याचे उत्पादन १५ क्विंटलपेक्षा जास्त येण्याची शक्यता आहे. SRT सुरू केल्यानंतर पारंपरिक शेतीपेक्षा मोठा फरक जाणवला; अनाठायी खर्च थांबला, बियाण्यांची बचत झाली, मजुरीवरील खर्च कमी झाला आणि जमिनीचा पोत सुधारून सेंद्रिय कर्ब वाढल्यामुळे रासायनिक वापर जवळपास बंद झाला. फवारण्या व कृषी केंद्राच्या फेऱ्या कमी झाल्याने मानसिक ताणही घटला आणि सर्वात मोठा बदल म्हणजे सावकार किंवा सरकारी कर्ज घेणे थांबले. आज ते हजारो शेतकऱ्यांना SRT बद्दल मार्गदर्शन करत असून स्वतः सुखी, समाधानी व आत्मविश्वासपूर्ण शेतकरी म्हणून उभे आहेत.


अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

SRT®
HEALTHY SOIL FOR HEALTHY FOOD

# एस. आर. टी.
# शेतीशाळा केंद्र धारक



अनुक्रमणिका

जिल्हावार सूची



# १

## श्री. विठ्ठल मारोती वैद्य

मु. कुसळी, ता. बदनापूर,
जि. जालना
मो. 76208 70425

निरोगी शरीरासाठी हिमोग्लोबिन जसे महत्त्वाचे, तसेच निरोगी शेतीसाठी सेंद्रिय कर्ब आवश्यक असतो, ही जाणीव पॅथॉलॉजी व्यवसायामुळे विठ्ठल वैद्य यांना झाली. मातीची तपासणी केली असता सेंद्रिय कर्ब कमी असल्याचे दिसले. तो वाढवण्याचा शोध घेताना त्यांना SRT तंत्रज्ञानाची ओळख झाली आणि कमी खर्चात जमीन समृद्ध करणारा हा परिणामकारक मार्ग असल्याचे उमगले.

खर्चात बचत, उत्पादनवाढ, कमी कष्ट आणि बियाण्यांची बचत हे फायदे पाहून त्यांनी SRT स्वीकारले. SRT अवलंबानंतर मातीची धूप थांबली, मजुरी व कष्ट कमी झाले आणि बचत वाढली. ते ११.५ एकरावर कापूस, सोयाबीन, तूर, मका, हरभरा, गहू, ज्वारी, बाजरी व भुईमूग ही पिके घेतात.

या बदलांमुळे घरात समृद्धी, समाधान आणि आनंद वाढल्याचे ते सांगतात. पूर्वीचा पैशाचा ताण कमी होऊन घरातील वातावरण प्रसन्न झाले. SRT तंत्राचे स्टार प्रचारक विठ्ठलदादांच्या शब्दांत — “माती बलवान, पीक पैलवान आणि शेतकरी धनवान.”

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



२

## श्री. रावसाहेब दगडू मोरे

मु. बाभुळगाव, ता. फुलंब्री,
जि. छत्रपती संभाजीनगर
मो. 74994 82922

"काळ आला पण वेळ नाही" असे सांगणारे रावसाहेब मोरे हे २००१ पासून शेतीवरील वाढत्या खर्चामुळे कर्जबाजारी झाले. मशागत, बियाणे, खते व औषधांचा खर्च वाढत गेला; पण उत्पन्न साथ देत नव्हते. २०१८ पर्यंत कर्ज सुमारे १२ लाखांवर गेले. नैराश्य इतके वाढले की शेती विकावी का जीवन संपवावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला. शेवटी ते आत्महत्येच्या विचारापर्यंत पोहोचले. घरी कोणालाही न सांगता दोरी घेऊन ते शेताकडे निघाले.

याच वेळी गावात SRT माहिती देण्यासाठी आलेल्या नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्पाच्या कर्मचाऱ्यांची आणि स्व. खंडागळे साहेबांची त्यांना भेट झाली. त्यांच्या मार्गदर्शनाने SRT स्वीकारले. मक्याचे एकरी ५२ क्विंटल उत्पादन मिळाले आणि आत्मविश्वास वाढला. पुढे दोन एकर आल्याला चांगला भाव मिळून एकूण सुमारे १८ लाखांचे उत्पन्न झाले व त्यांनी सर्व कर्ज फेडले.

आता शेतीचा खर्चच कमी झाला असून उत्पन्न मात्र भरपूर आहे. आज ते चिंतामुक्त आहेत. मिळालेला वेळ ते SRT प्रसारासाठी देत गावोगावी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. त्यांच्या मते SRT ने त्यांच्या जीवनाला नवी दिशा दिली आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# ३

## श्री. रामचंद्र प्रभाकर पुंड

मु. बाजार सावंगी, ता खुलताबाद,
जि. छत्रपती संभाजीनगर
मो. 98608 21601

नैराश्य आणि कर्जाच्या तणावात असताना त्यांना एस आर टी तंत्र मिळाले आणि त्यांच्या जीवनात मोठा बदल झाला. ते सांगतात की एस आर टी नसते तर कदाचित आज मी आपल्यासोबत नसतो. एस आर टी तंत्रामुळे त्यांचे कुटुंब शेतीतून आनंदी व आत्मनिर्भर झाले आणि समाजात प्रतिष्ठा मिळाली.

हे त्यांचे एस आर टीचे पाचवे वर्ष आहे. ५ एकर क्षेत्रावर मका, कापूस, ऊस, गहू, कांदा, लसूण आणि हरभरा पिके घेतात. एस आर टी पद्धतीवर त्यांनी अतिउत्तम प्रतीचा ऊस घेतला आहे, याची विशेष नोंद घ्यावी.

काळ्या आईवरील नांगरणीचे अत्याचार त्यांनी थांबवले. शेतात बाराही महिने गांडुळे व सूक्ष्मजीव वाढले. माती हलकीफुलकी झाली, कष्ट कमी झाले आणि अशी पिके त्यांनी पूर्वी कधी पाहिली नव्हती. पिढ्यान् पिढ्या अंधकार दूर करून शेतकऱ्यांच्या चेहेऱ्यावर आनंद आणणारे हे तंत्र आहे. शेती ही करायची नसून शिकायची गोष्ट आहे हे त्यांना गुरूमुळे उमगले. ते एकच संदेश देतात, एस आर टी तंत्र शिका, समजून वापरा आणि आयुष्याचे कल्याण करा.

नैराश्य आणि कर्जाच्या तणावात असताना त्यांना SRT तंत्र मिळाले आणि त्यांच्या जीवनात मोठा बदल झाला. ते सांगतात की हे तंत्र नसते तर कदाचित आज मी आपल्यासोबत नसतो. या पद्धतीमुळे त्यांचे कुटुंब शेतीतून आनंदी व आत्मनिर्भर झाले आणि समाजात प्रतिष्ठा मिळाली.

पिढ्यान् पिढ्यांचा अंध:कार दूर करून शेतकऱ्यांच्या चेहेऱ्यावर आनंद आणणारे हे तंत्र आहे. 'शेती ही करायची नसून शिकायची गोष्ट आहे' हे त्यांना उमगले. ते एकच संदेश देतात, SRT तंत्र शिका, समजून वापरा आणि आयुष्याचे कल्याण करा.

# ४



## श्री. शिरीष कुलकर्णी

मु. पानगाव, ता. रेणापूर,
जि. लातूर
मो. 94226 12289

शिरीष कुलकर्णी हे निवृत्त उपअभियंता असून लातूर येथील शेतकरी आहेत. कुटुंबाकडून मिळालेल्या २० एकर शेतीची जबाबदारी स्वीकारताना पारंपरिक व अति कष्टप्रद शेतीपद्धतीबद्दल त्यांच्या मनात अनिश्चितता होती. मशागतीची साधने, बैल आणि मजूर यांवर अवलंबून राहावे लागेल याचीही चिंता होती.
श्री. विठ्ठल वैद्य यांच्या शेताला भेट दिल्यानंतर त्यांना शून्य मशागत शेतीची खरी ओळख झाली आणि त्यातूनच या पद्धतीची आवड निर्माण झाली. पुढे त्यांनी SRT तंत्र स्वीकारत शेती सुरू केली. १.२५ एकर क्षेत्रात पारंपरिक पद्धतीने गव्हाचे १६ क्विंटल उत्पादन मिळाले; त्याच क्षेत्रात SRT पद्धत वापरल्यानंतर उत्पादन १८ क्विंटल झाले आणि त्यांचा आत्मविश्वास अधिक बळावला. सोयाबीन, तूर, हरभरा, ज्वारी, गहू या पिकांतही समाधानकारक उत्पादन मिळत आहे.
आज त्यांचे १२ एकर क्षेत्र SRT वर असून विविध पिकांत समाधानकारक उत्पादन मिळत आहे. कमी खर्च, कमी मनुष्यबळ आणि सुधारलेला जमिनीचा पोत यामुळे शेती सुलभ व समाधानकारक झाली आहे. Srt टीमच्या प्रेरणेने ते इतर शेतकऱ्यांनाही या पद्धतीकडे वळण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत.

५



## श्री. परशुराम तातू आगिवले

मु. मोगरज, ता. कर्जत,
जि. रायगड
मो. 91723 32629

परशुराम तातू आगीवले एक आदिवासी ठाकूर समाजातील शेतकरी. भीमाशंकर डोंगराच्या पायथ्याशी मोग्रज या गावात राहतात. शेतीची भयंकर आवड त्यामुळे गावातल्या घरात न राहता शेतावरच झोपडी वजा घर बांधले आहे व तिथेच त्यांची पत्नी इंदू व दोन मुली प्रगती आणि आदिती यांसोबत राहतात. आज त्यांचे जीवनमान इतके उंचावले आहे की समाजात त्यांची एक विशेष ओळख निर्माण झाली आहे. त्यासोबत त्यांचे सहकारी सुद्धा खूप आनंदी झाले आहेत. हा बदल घडला तो फक्त SRT मुळे.

परशुराम आगीवले यांचे SRT चे हे १० वे वर्ष आहे. दरवर्षी ते एकामागून एक अशी किमान तीन पिके घेतात. रब्बी हंगामात तर त्यांनी २ एकर क्षेत्रात जवळ जवळ २०-२५ प्रकारची कडधान्ये व भाजीपाला पिके घेतली आहेत. हे सर्व काम करायला त्यांना बाहेरील एकही मजूर लागला नाही, घरच्याच माणसांकडून (पत्नी व मुली) सर्व काम साधत आहेत. तयार झालेली भाजी ते गावोगावी टेम्पो च्या साहाय्याने विकतात. यातून त्यांना रोख भाव मिळतो. आज कशेळे, कर्जत भागात फ्रेश ताजीतवानी भाजी म्हटलं की परशुराम भाऊंच्या शेतावरची भाजी किंवा मोग्रजची भाजी म्हणून त्यांचे नाव झाले आहे. १० वर्षांपूर्वी त्यांना ज्या जागेतून १५ ते २० पोती भात व १८ ते २० हजार रुपयांचा इतर शेतीमाल मिळत असे गेल्या ५-६ वर्षापासून भाताचे उत्पादन दुप्पटीपेक्षा (३५ ते ४० पोती) जास्त वाढले आहे व वरील प्रकारचा शेतीमाल विक्रीतून ३ लाखापर्यंत वार्षिक उत्पादन मिळू लागले आहे. SRT ची जोड नसती तर एव्हाना माझ्या मुलींची लग्न करून मोकळा झालो असतो (अर्थात वैयक्तिक कर्जाचा आधार घेऊन) पण आता मिळालेल्या आर्थिक स्थैर्य व आत्मविश्वासामुळे या मुली नर्सिंग व कॉलेज शिक्षण घेऊ शकत आहेत. SRT मुळे मला व माझ्या सहकाऱ्यांना मिळालेला आत्मविश्वास, प्रतिष्ठा, सन्मान आणि आनंद आमच्या व परिसरातील आदिवासी समाजात चैतन्य निर्माण करीत आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



६

## श्री राहुल दिलीप पाटील

मु. गोंदेगाव, ता. जामनेर,
जि. जळगाव
मो. 87881 78382

“शेती तोट्याची आहे असे ज्यांना वाटते, त्यांना आम्ही सिद्ध करून दाखवले की SRT शेती म्हणजे पूर्ण नफा,” असे छातीठोकपणे सांगणारे राहुल पाटील हे SRT तंत्राचा अवलंब करणारे प्रगत शेतकरी आहेत. त्यांच्या SRT शेतीचे दुसरे वर्ष सुरू असून ते १० एकर क्षेत्रावर कापूस, मका, गहू, हरभरा, तूर व भुईमूग ही पिके घेतात. कापूस एकरी १८ क्विंटल आणि मका एकरी ६७ क्विंटल असे विक्रमी उत्पादन त्यांनी घेतले आहे.

या तंत्रामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वेगाने वाढून माती अधिक जिवंत झाली आहे. रोग व किडींचा त्रास कमी झाला असून गांडुळे, सूक्ष्मजीव आणि मित्र बुरशींची नैसर्गिक वाढ दिसून येते. गादीवाफ्यांमुळे जास्त पाणी निघून जाते, तर कमी पाण्यातही पिकांना आधार मिळतो, त्यामुळे हवामानातील असमतोलाचा परिणाम कमी जाणवतो. मजुरीची गरज आणि खर्च दोन्ही घटल्याने शेती अधिक परवडणारी झाली आहे. मजूर मिळवण्यासाठी त्यांच्या दारी तिष्ठत बसण्याचा मनस्ताप कमी झाल्याने शेतकरी खऱ्या अर्थाने बळीराजा झाला आहे, असे ते समाधानाने सांगतात.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



७

## श्री. किरण संपत यादव

मु. संगमनेर, ता. भोर,
जि. पुणे
मो. 88882 15295

“अनेक शेतकऱ्यांच्या विविध गरजा पूर्ण करणारी एकमेव शेती पद्धती म्हणजे SRT शेती पद्धती होय” असे किरण यादव ठामपणे सांगतात. आठ वर्षांपासून ते २ एकर क्षेत्रावर SRT शेती तंत्राचा अवलंब करत आहेत. ते वर्षभरात भात, भुईमूग, ज्वारी, बाजरी, कांदा, टोमॅटो आणि काकडी ही पिके घेतात. भुईमूग एकरी ३० क्विंटल, भात ९८ किलो प्रति गुंठा आणि १० गुंठ्यांत ५२० क्रेट टोमॅटो असे उल्लेखनीय उत्पादन त्यांनी घेतले आहे.

SRT हे तंत्र नांगरणी, चिखळणी आणि लावणीशिवाय विविध पिकांची लागवड शक्य करणारे, खर्च आणि कष्ट दोन्ही कमी करणारे आधुनिक तंत्र आहे. त्यांच्या मते SRT म्हणजे शेतीचा आत्माच आहे. उत्पादन खर्च कमी करत उत्पादन आणि दर्जा वाढवणारी, निसर्गाचा समतोल राखत जमिनीची सुपीकता वृद्धिंगत करणारी ही पद्धत आहे.

ते म्हणतात की “SRT मुळेच ते नोकरी सांभाळून शेती करू शकतात; अन्यथा इतर कामांत व्यस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी शेती करणे कठीण झाले असते.” त्यांच्या अनुभवाने ही पद्धत शेती सोपी, टिकाऊ आणि आनंद देणारी ठरली आहे.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



## श्री. विलास गजानन महल्ले

मु. दिघी (म), पो. धामणगाव,
जि. अमरावती
मो. 90962 69333

“SRT शेतकरी म्हणून आम्ही केवळ शेती करत नाही, तर पर्यावरण आणि देशहित जपतो,” असे छातीठोकपणे सांगणारे विलास महल्ले गेल्या पाच वर्षांपासून १० एकर क्षेत्रावर SRT पद्धतीने शेती करत आहेत. श्री. विठ्ठलजी वैद्य यांच्या व्हिडिओतून त्यांना प्रेरणा मिळाली. घरून आणि गावातून विरोध झाला तरी त्यांनी लक्ष्य सोडले नाही. परिणामी भूमाता आणि पिके दोन्ही सशक्त झाली; “तन देई धन” या उक्तीप्रमाणे त्यांनी रान जपले.

स्वतःच्या चुका ओळखून इतरांना योग्य पद्धत सांगण्याइतका आत्मविश्वास त्यांना आला आहे. SRT मुळे पैसा, कष्ट आणि वेळ यांची बचत झाली. जमिनीची हालचाल कमी ठेवून, तणनाशके वापरून, मागील पिकांची मुळे जमिनीत ठेवून जमीन अधिक सुपीक झाल्याचा त्यांचा अनुभव आहे. त्यामुळे उत्पादनाचा दर्जा उत्तम होतो आहे हे त्यावर आवर्जून सांगतात.

आज ते आनंदी SRT शेतकरी असून इतरांनाही हा मार्ग कळावा म्हणून शेती शाळा, मेळावे आणि शिवारफेऱ्यांतून डिझेल बचत, कमी यांत्रिकीकरण आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व जनजागृती करतात. ते पटवून देतात.



९

## श्री. उमेश गोविंदराव पोहदरे

मु. येवती, पो. धानोरा, ता. राळेगाव,
जि. यवतमाळ
मो. 97675 15410

शेकडो शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे उमेश पोहदरे हे SRT तंत्राचा पाच वर्षांपासून यशस्वी अवलंब करणारे प्रगत शेतकरी असून २८ एकर क्षेत्रावर शेती करतात. कापूस, तूर, सोयाबीन, चना, ज्वारी, गहू व रब्बी तूर ही त्यांची प्रमुख पिके आहेत. SRT पद्धतीने त्यांनी सोयाबीन १६, चना १५ आणि कापूस १५ क्विंटल एकरी असे उल्लेखनीय उत्पादन घेतले आहे.

SRT मुळे अनाठायी खर्च थांबला, बियाण्यांची बचत झाली आणि मजुरीवरील खर्च व वेळ कमी झाला. जमिनीचा पोत सुधारून सेंद्रिय कर्ब वाढला; रासायनिक वापर जवळपास बंद झाल्याने फवारण्या आणि कृषी केंद्राच्या फेऱ्या कमी झाल्या, त्यामुळे ताणही हलका झाला. सावकार किंवा सरकारी कर्ज घेणे बंद झाले, हा त्यांच्या जीवनातील मोठा बदल ठरला. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून विविध कृषी मेळावे, सभांमध्ये मार्गदर्शनासाठी निमंत्रित केले जाते. पोहदरे सांगतात, “SRT स्वीकारल्यामुळेच मी आज सुखी, समाधानी आणि आनंदी शेतकरी आहे.”

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



# १०

## श्री. कृष्णा वाघुजी गेडाम

मु. बिरसा मुंडा फार्म हाऊस, ता. राजुरा,
जि. चंद्रपूर
मो. 97631 66223

कृष्णा गेडाम म्हणतात , पारंपरिक पद्धतीत शेती म्हणजे कष्ट आणि चिंता होती आणि आता एस आरटीचे शेतकऱ्यांचे जीवन सुखमय व समृद्ध झाले आहे . ते सहा वर्षांपासून ९ एकर क्षेत्रावर SRT तंत्राचा अवलंब करन भात, कापूस, सोयाबीन, तूर, मका, चना, गहू व भाजीपाला ही पिके घेतात.

त्यांच्या मते वारंवार नांगरणी करून भूमातेला उन्हात तापवणे म्हणजे जमिनीवर अन्यायच आहे. सततच्या नांगरणीमुळे जमीन नापीक होते, खर्च वाढतो आणि शेतकरी कर्जबाजारी होतो. परिस्थिती गंभीर झाल्यास जमीन विकावी लागते व शहरांकडे स्थलांतर करावे लागते, ज्याचा धोका कुटुंबासह देशाच्या अन्नसुरक्षेलाही असतो. SRT पद्धतीत जमिनीची हालचाल कमी राहते, त्यामुळे मातीची सुपीकता टिकते.

SRT मुळे रासायनिक खते आणि मजुरीवरील खर्च कमी होतो, उत्पादनात वाढ दिसते आणि दुष्काळातही पिके चांगली येतात, असा त्यांचा अनुभव आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता कमी होऊन आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या मते शेती टिकवण्यासाठी आणि शेतकरी सक्षम ठेवण्यासाठी SRT तंत्रज्ञान ही आजच्या काळाची गरज आहे.



# ११

## श्री. सदाशिव वामनराव अडकीने

मु. ईजंनगाव पश्चिम, ता. वसमत,
जि. हिंगोली
मो. 98340 12036

सदाशिव अडकीने हे सहा वर्षांपासून SRT तंत्राचा अवलंब करणारे प्रगत शेतकरी आहेत. त्यांच्या शेतात करवंद, पेरू, आंबा, लिंबू, कांदा तसेच काशीफळ, डांगर, कोहळा यांसारखी वेलवर्गीय पिके घेतली जातात. सुपीक झालेल्या जमिनीमुळे त्यांच्या फळांना उत्तम दर्जा मिळून हातोहात विक्री होते.
२०२० साली करवंद बागेच्या पाहणीदरम्यान सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांनी त्यांना SRT तंत्रज्ञानाची माहिती दिली आणि तेथूनच त्यांनी या पद्धतीची सुरुवात केली. काही वर्षांत जमिनीची सुपीकता वाढली, उत्पादन खर्च निम्म्यावर आला आणि फळांच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली. खते, औषधे व ट्रॅक्टरवरील खर्च कमी झाला, मजुरीची गरजही घटली. सहा एकरात आतापर्यंत १०–१२ लाख रुपयांची बचत झाल्याचा त्यांचा अनुभव आहे.
ह्या पद्धती मुळे पैसे, वेळ आणि कष्ट यांची मोठी बचत झाली. त्यातूनच त्यांनी फळ प्रक्रिया उद्योग उभारून शेतीला उद्योगाची सुंदर जोड दिली. आज ते शेती शाळेच्या माध्यमातून SRT तंत्राचे मार्गदर्शन आणि आपले अनुभव इतर शेतकऱ्यांना त्यांची शेती अधिक चांगली व सक्षम व्हावी या हेतूने देत आहेत. त्यांच्या शब्दांत, “SRT मुळे मी केवळ शेतकरी नाही तर उद्योजकही झालो.”



# १२

## श्री संजय शंकरराव चिचघरे

पो. पेंढरी (देवळी), ता. हिंगणा,
जि. नागपूर
मो. 99218 95129

संजय चिचघरे हे SRT तंत्राचा तीन वर्षापासून अवलंब करणारे शेतकरी आहेत. ते कापूस, तूर, मका, गहू, चणा तसेच वांगी, टोमॅटो, चवळी, गवार यांसारखी भाजीपाला पिके घेतात. कापसाचे एकरी १६ क्विंटल असे विक्रमी उत्पादन त्यांनी घेतले आहे.

SRT मधील विना मशागत पद्धतीमुळे गांडुळे, सूक्ष्मजीव व मित्र बुरशी सक्रिय राहतात. पिकांचे अवशेष सडून ओलावा टिकतो, जमीन भुसभुशीत राहते आणि सेंद्रिय कर्ब वाढतो. त्यामुळे पावसातील खंडातही पिके ताण सहन करतात. एस आर टी वापरायला सुरुवात केल्यापासून जमिनीची जलधारण क्षमता वाढल्याने विहिरीची जल पातळी सुधारली आहे. आजुबाजुला मधमाशांच्या वाढीमुळे उत्पादन उत्पादन वाढले आहे.

चिंतामुक्त व भरघोस उत्पन्न देणाऱ्या शून्य मशागत तंत्राच्या आपल्या अनुभवाचा फायदा आपल्या शेती शाळेतून ते शेतकऱ्यांना करून देत असतात.

अनुक्रमणिका
जिल्हावार सूची



१३

## श्री. संदीप नामदेव भागवत

मु.पो. कोल्हा, ता. अचलपूर,
जि. अमरावती
मो. 93092 30015

संदीप भागवत हे गेली चार वर्षे SRT शून्य मशागत पद्धतीने 5 एकरावर शेती करत आहेत. सोयाबीन, तूर, चणा, गहू, कांदा व कापूस ही त्यांची प्रमुख पिके आहेत. त्याच त्या गादीवाफ्यावर फेरपालट पद्धतीने विविध पिके घेत त्यांनी उत्पादनात वाढ अनुभवली आहे .

शून्य मशागतीमुळे आंतरमशागतीचा खर्च थांबून दरवर्षी सुमारे ७५ हजार रुपयांची बचत होत असल्याचे ते सांगतात. शारीरिक श्रम कमी झाले, रासायनिक खतांचा वापर घटला आणि जमीन अधिक सुपीक झाली. शेतात गांडुळांची वाढ दिसून येत असून मातीचा जिवंतपणा परतल्याचा त्यांना आनंद आहे.

त्यांच्या मते SRT म्हणजे मातीला श्रीमंत बनवण्याचा मार्ग आहे. तण व्यवस्थापनाचा खर्च कमी होतो आणि शिवाय जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढतो. कमी अवजारांत, बैल-ट्रॅक्टरशिवाय शेती शक्य होते. त्यामुळे वेळ व खर्च दोन्ही वाचतात. त्यांच्या शब्दांत “माती बलवान तर पीक पैलवान, आणि शेतकरी चिंतामुक्त .”



# १४

## श्री. राजकुमार रामभाऊ ठाकरे

ता. नांदगाव खंडेश्वर,
जि. अमरावती
मो. 94229 14501

राजकुमार ठाकरे हे गेली ४ वर्षे एस.आर.टी. पद्धतीने शेती करत आहेत. प्रामुख्याने ते सोयाबीन, तूर,मुग, उडीद,हळद, गहू, हरभरा, इत्यादी पिके तसेच फळबाग - लिंबू , पेरू, शेवगा ही पिके घेतात. त्यांचे एस आर टी चे एकूण क्षेत्र - ८.५ एकर आहे. एस आर टी मुळे बियाणे, मजुरी, ट्रॅक्टर या सर्व खर्चात बचत होऊन जमिनीचा कर्ब वाढत असल्याने भुमाता सशक्त होत आहे.

मी चार वर्षाआधी एकदाच शेतीमध्ये एस आर टी बेड बनवले तेव्हा पासून आजपर्यंत कोणतीही मशागत केली नाही, म्हणजेच माझी वार्षिक हजारो रुपयांची बचत झाली व सोबतच माझे जमिनीचा सेंद्रिय कर्ब सुद्धा वाढत आहे व पिक सुद्धा विषमुक्त व सकस मिळत आहे. मला दरवर्षी जो तणनियंत्रण करीता जो खर्च व्हायचा त्या मजुरी खर्चात बचत झाली आहे, तसेच कितीही अतीव्रुष्टी झाली तरी पण माझे शेतातुन फक्त स्वच्छ पाणी वाहत असते व एस आर टी पद्धतीमुळे विहिरीच्या पाणी पातळीत पणं हळूहळू वाढ होत आहे. म्हणजे एस आर टी पद्धतीचे फायदे च फायदे आहेत.



# १५

## सौ. पुनम सचिन बडोने

मु. यावली शहीद,
जि. अमरावती
मो. 77092 86665

पुनम बडोने या गेल्या तीन वर्षांपासून ४ एकर क्षेत्रावर SRT पद्धतीने तूर व सोयाबीन ही पिके घेत आहेत. पारंपरिक शेतीत खर्च, माती वाहून जाणे आणि मजूर टंचाई यांचा मोठा त्रास होता; पण SRT मुळे मातीचे नुकसान थांबले, जास्तीचे पाणी निचऱ्याने बाहेर जाऊ लागले आणि जमीन अधिक सुपीक झाली. विहिरीची पाण्याची पातळीही वाढली असून मातीला सेंद्रिय सुगंध जाणवतो, असा त्यांचा अनुभव आहे.

ट्रॅक्टरची चिंता न करता हॅंड पुश सीड ड्रिलने वेळेवर पेरणी शक्य झाली. बियाणे व रासायनिक खतावरील खर्च कमी झाला आणि पिके सुदृढ व जोमदार झाली. पिके लवकर परिपक्व होऊन बाजारात चांगल्या दरात विक्रीस जातात. तूर पिकात पूर्वी ८–१० किलो बियाणे लागत असे; आता सुमारे १ किलो बियाण्यात प्रभावी पेरणी होते. खोड जाड, फांद्या जास्त आणि मर रोग कमी दिसतो.

या बदलांमुळे खर्चात बचत, मातीची सुधारलेली कणरचना आणि उत्पन्नात वाढ झाली. त्यांच्या मते SRT पद्धतीने शेती केल्यास “माती बलवान, पीक पैलवान आणि शेतकरी धनवान” होऊ शकतो.



# १६

## सौ. लता अनिलराव पोहेकर

मु.पो.निंभी, ता.मोर्शि,
जि. अमरावती
मो. ९०२२९६५४२२

सौ. लता पोहेकर या srt तंत्रज्ञाना वर आधारित पद्धतीने ........ वर्षे ,विविध पिके घेणाऱ्या प्रगत शेतकरी आहेत. त्या तूर, कापूस, हळद, मूग, उडीद, गहू, हरभरा, धान, जवस तसेच भाजीपाला पिकांची लागवड SRT तंत्राने करतात. बदलत्या हवामानातही नेमके पिकनियोजन करून विविधता राखण्यावर त्यांचा भर असतो.

SRT पद्धतीमुळे कमी खर्चात शेती शक्य झाल्याचा त्यांचा अनुभव आहे. शून्य मशागतीमुळे नांगरट टळते आणि ट्रॅक्टरची प्रतीक्षा करावी लागत नाही, त्यामुळे वेळेवर पेरणी व पाण्याचा योग्य वापर साधतो. बियाण्यांची बचत होते, जमिनीची हालचाल कमी राहते आणि माती अधिक सशक्त बनते. खर्च घटल्याने नफा वाढतो.

सकस जमिनीतून येणारी निरोगी पिके मानवाच्या आरोग्यालाही पोषक ठरतात. त्यांच्या मते आजच्या परिस्थितीत SRT पद्धत शेतीसाठी संजीवनी ठरत आहे.



# १७

## श्री. अभिनंदन अजित सौंदत्ते

मु. हुपरी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर
मो. 8446974665

अभिनंदन सौंदत्ते हे गेली ४ वर्ष एस.आर.टी. पद्धतीने शेती करत आहेत. त्यांच्या शेतात ते भुईमूग ,गहू, मुग, भात, ऊस, तंबाखू हरभरा, कांदा, इत्यादी पिके घेतात. त्यांचे एकूण एस.आर.टी. शेतीचे २० एकर क्षेत्र आहे. एस.आर.टी शेती करत असल्यापासून ते आणि त्यांचे कुटुंब खूप आनंदी झाले आहेत. तसेच जमीनीची सुपीकता वाढलेली आहे, सुक्ष्म जीवाची संख्या ही वाढलेली दिसून येते. जमीनीत वापसा स्थिती कायम राहते . त्यामूळे गहू पिक अर्धा एकर मध्ये १८ पोती झाली. भाताची १७ पोती झाली, तसेच आता तंबाखू ६ फूट उंची गाठली आहे.

असतो. SRT पद्धतीत जमिनीची हालचाल कमी राहते, त्यामुळे मातीची सुपीकता टिकते.

SRT मुळे रासायनिक खते आणि मजुरीवरील खर्च कमी होतो, उत्पादनात वाढ दिसते आणि दुष्काळातही पिके चांगली येतात, असा त्यांचा अनुभव आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता कमी होऊन आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या मते शेती टिकवण्यासाठी आणि शेतकरी सक्षम ठेवण्यासाठी SRT तंत्रज्ञान ही आजच्या काळाची गरज आहे.

CQUESTER TECHNOLOGIES

# CQUESTER कंपनी विषयी थोडक्यात

**नमस्कार मंडळी,**

**CQuester** ही SRT शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिट मिळवून देणारी भारतीय कंपनी आहे. जे शेतकरी SRT तंत्राचा तंतोतंत अवलंब करतील त्यांना कार्बन क्रेडिटचा लाभ व शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाचे एकत्रीकरण करून वाजवी भावाची हमी या कपंनीच्या सहकार्याने मिळवून देता येणार आहे.

SRT तंत्राचे जनक कृषिरत्न कृषिभूषण चंद्रशेखर दादा भडसावळे हे स्वतः **CQuester या कंपनीमध्ये मध्ये Technical Chairperson** (तांत्रिक अध्यक्ष) म्हणून काम पाहणार आहेत. म्हणजे SRT संबंधित शास्त्र-विज्ञान, आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी जे निर्णय होतील, त्यात त्यांची थेट भूमिका असेल. **SRT ची दिशा आणि शेतकऱ्याचा फायदा हाच या कंपनीचा केंद्रबिंदू आहे.**

“CQuester कपंनी शेतकऱ्याला कशी मदत करू शकते ?

**SRT शेतीतंत्र अवलंबल्यामुळे आपल्या माती आणि हवामानाला जो फायदा होतो, याचे मोजमापन करून त्याचे आर्थिक मोल शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे काम CQuester कपंनी करणार आहे.**

**शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिट मिळण्यासाठी खालील पायऱ्या आहेत:**

१. शेतकऱ्यांनी CQuester कंपनीच्या कार्यक्रमात सहभागी होणे - आपल्या जवळच्या SRT च्या अधिकृत शेतीशाळा केंद्रातून शेतकऱ्यांना नाव नोंदणी करता येईल.

अनुक्रमणिका जिल्हावार सूची

# CQUESTER कंपनी विषयी थोडक्यात

२. CQuester कंपनी सोबत सामंजस्य करार (MoU) करणे -
शेतकऱ्याचे नाव, गट नंबर, शेतीचा तपशील आणि पिकाची माहिती या करारात नोंदवली जाईल.
तसेच CQuester कंपनी, सगुणा रुरल फाउंडेशन (SRF) संस्था आणि शेतकरी यांच्या भूमिका आणि नियम या करारात लिहलेले असतील.

३. SRT शेतीशाळा केंद्रामधून SRT पुनरुत्पादक शेतीचे प्रशिक्षण घेणे -
SRT शेतीचा शास्त्रशुद्ध अभ्यास, विज्ञान, प्रोटोकॉल याची प्रेझेंटेशनद्वारे माहिती तसेच शेतात प्रत्यक्ष माहिती या एकदिवसीय प्रशिक्षणातून घेता येईल. SRT शेती प्रशिक्षणाचे अधिकृत प्रमाणपत्र शेतकऱ्यांना मिळेल जे CQuester कंपनी सोबत सामंजस्य करार करताना अतिशय उपयोगी ठरेल.

४. CQuester कंपनीच्या टीमद्वारे मातीचे नमुने आणि शेतीचा डेटा कलेक्शन करणे -
आपल्या शेतातून वेगवेगळ्या टप्प्यात मातीचे नमुने घेतले जातील.
आपली वैयक्तीक माहिती, पिकाची माहिती, शेताचे फोटो आणि GPS लोकेशन घेतले जाईल.

५. CQuester कंपनी मार्फत कार्बन प्रोजेक्ट तयार करणे -
जमा केलेल्या माती आणि शेतीच्या डेटावरून मातीचे आरोग्य कसे आहे आणि कार्बन फायदा किती आहे, हे मोजले जाईल.
यावर आधारित पुढे कार्बन क्रेडिट्सचे प्रोजेक्ट तयार केले जातील.

६. कार्बन क्रेडिट्स प्रोजेक्ट कंपन्यांपर्यंत पोहोचवणे व शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे -
तयार झालेले कार्बन क्रेडिट्स विविध कंपन्या खरेदी करतील. त्यातून मिळणारा आर्थिक लाभ CQuester कंपनीच्या नियमांनुसार शेतकऱ्यांपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचवला जाईल.

# राष्ट्रपती भवनातील सन्मान









SAGUNA RURAL FOUNDATION

सगुणा बाग
शेतीतून प्रतिष्ठेकडे ...

## सगुणा रुरल फाउंडेशन, नेरळ, रायगड

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

एस. आर. टी.

# सोशल मीडिया



एस.आर.टी. कृषी रोबोट →

एस.आर.टी. वेबसाईट →

एस.आर.टी. फेसबुक →

एस.आर.टी. युट्युब →

अनुक्रमणिका

जिल्हावार सूची

एस. आर. टी.

# जिल्हावार सूची

- अहिल्यानगर
- छ. संभाजीनगर
- जळगाव
- जालना
- ठाणे
- नंदुरबार
- नाशिक
- नागपूर
- परभणी
- पुणे
- बीड
- बुलढाणा
- रत्नागिरी
- रायगड
- लातूर
- वर्धा
- सातारा
- चंद्रपूर
- कोल्हापूर
- यवतमाळ
- अमरावती
- हिंगोली

---

## राज्य

- गुजरात
- तेलंगणा
- आंध्र प्रदेश

अनुक्रमणिका

### एस. आर. टी.
# जिल्हावार सूची

## पश्चिम महाराष्ट्र

### पुणे

- सौ. कीर्ती केशव नगरे
- श्री. किरण संपत यादव

### सातारा

- श्री. विद्याधर बबनराव शिंदे

### कोल्हापूर

- श्री. अभिनंदन अजित सौंदत्ते

## कोकण

### ठाणे

- श्री. वामन पदु कडाळी
- श्री. विलास मनोहर झुंझारराव

### रत्नागिरी

- श्री. गोपाळ शंकर झगडे

### रायगड

- श्री. रामचंद्र देहू हाबळे
- श्री. अरुण पंढरीनाथ तांडेल
- श्री. परशुराम तातू आगिवले

## खानदेश

### नाशिक

- श्री. शंकर गोविंदा गायकवाड
- श्री. महारु तुळशीराम जाधव

### नंदुरबार

- श्री. पंकज लोटन देसले

### जळगाव

- श्री. किशोर उत्तमचंद जैन
- श्रीमती उषा सुधाकर देवरे
- श्री राहुल दिलीप पाटील

अनुक्रमणिका

एस. आर. टी.

# जिल्हावार सूची

## मराठवाडा

### अहिल्यानगर

- श्री. निलेश दत्तात्रय पानसरे

### छत्रपती संभाजीनगर

- श्री. सुरेश अशोकराव नरवडे
- श्री. दिपक पुरुषोत्तम जोशी
- श्री. रामचंद्र प्रभाकर पुंड
- श्री. रावसाहेब दगडू मोरे

### बीड

- श्री. शिवाजी ज्ञानोबा बादाडे

### लातूर

- श्री. दत्तात्रय दगडू जंगाले
- श्री. शिरीष कुलकर्णी

### परभणी

- श्री. केशव आश्रुबा गिराम

### हिंगोली

- श्री. सदाशिव वामनराव अडकीने

### जालना

- डॉ. एस. डी. सोमवंशी
- सौ. मीरा राजेभाऊ काळे
- श्री. दिनकर संजयराव काळे
- डॉ. गणेश श्रीरंग पोटे
- श्री. विठ्ठल मारोती वैद्य

## विदर्भ

### अमरावती

- श्री. विलास गजानन महल्ले
- श्री. संदीप नामदेव भागवत
- श्री. राजकुमार रामभाऊ ठाकरे
- सौ. पुनम सचिन बडोने
- सौ. लता अनिलराव पोहेकर

### यवतमाळ

- श्री. उमेश गोविंदराव पोहदरे

### वर्धा

- श्री. राजाभाऊ वैकुंठराव देशमुख

अनुक्रमणिका

एस. आर. टी.

# जिल्हावार सूची

## विदर्भ

### बुलढाणा

- श्री. स्वप्नील दिपक महाजन

### नागपूर

- श्री संजय शंकरराव चिचघरे

### चंद्रपूर

- श्री. प्रकाश गणपतराव खोब्रागडे
- श्री. कृष्णा वाघुजी गेडाम

## इतर राज्ये

## आंध्र प्रदेश

### सत्यसाई जिल्हा

- श्री. नागेंद्र रेड्डी

## गुजरात

### धरमपूर

- श्री. गोविंद नेवजू धूम

## तेलंगणा

### करीमनगर

- श्री. भगवान रेड्डी

### हैदराबाद

- श्री. वेंकटराव मलेला

अनुक्रमणिका